## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ :-४०७३/२०२४/सांगली

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| नितेशकुमार रावसाहेब पाटील | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय कवठेमहांकाळ, जि. सांगली | तहसीलदार, तहसील कार्यालय कवठेमहांकाळ, जि. सांगली |

**( सुनावणी दिनांक - १८/१२/२०२५ )**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि.०४.०७.२०२४ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, प्रथम अपील सुनावणी घेतली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी हजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपीलार्थी यांनी खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| द्वितीय अपील क्र . | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|---|
| ४०७३ | १५.०४.२०२४ | मौजे म्हैशाळ येथील जमीन/वशी-१०९ कवठेमहांकाळ-२९.०४.१९८० नारयण दामोदर जगताप विरुध्द शंकर रावबा मुसळे या कामातील सर्व कागदपत्रांची माहिती. |

आज रोजी सुनावणी दरम्यान तसेच त्यांच्या लेखी निवेदनमध्ये अपिलार्थी यांनी नमुद केले की, "जन माहिती अधिकारी यांनी आजअखेर माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी देखील कार्यवाही केली नाही. द्वितीय अपिल दाखल केल्यानंतर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर

सुनावणी घेतली व माहिती देण्याचा आदेश दिला परंतु आजअखेर जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही केली नाही."

उपलब्ध अभिलेखावरून दिसुन येत की,प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलावर सुनावणी घेऊन दि.१२.०८.२०२४ रोजी अपिलार्थीला माहिती देणेचा आदेश पारित केला आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपील आदेशाची अंमलबजावणी केल्याचे दिसुन येत नाही. जन माहिती अधिकारी यांची ही कृती माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींचे उल्लंघन करणारी आहे. या गंभीर निष्काळजीपणाबद्दल आयोगाद्वारे जन माहिती अधिकारी यांना समज देण्यात येत आहे. भविष्यात प्राप्त होणाऱ्या माहिती अर्जावर कार्यवाही करताना, त्यांनी माहिती अधिकार कायद्यातील सर्व संबंधित तरतुदींचे काटेकोरपणे आणि विहित कालमर्यादेत पालन करावे, अन्यथा त्यांच्यावर कायद्यानुसार योग्य ती दंडात्मक कार्यवाही प्रस्तावित केली जाईल. अपिलार्थी यांना माहितीचे प्रदान झाले नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार,तहसील कार्यालय कवठेमहांकाळ, जि. सांगली यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र "अ" मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहीत तरतूदीनूसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसांचे आत अपिलार्थीस विनामुल्य उपलब्ध करून द्यावी. माहिती आढळ न झाल्यास तसे प्रतिज्ञापत्र आयोगास सादर करावे व त्याची एक प्रत अपिलार्थीस पुरवावी.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय कवठेमहांकाळ, जि. सांगली यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

उपरोक्त निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. ४०७३/२०२४/सांगली 2087

दिनांक - 8/5/2025